लोकमत

# निटूर जि.प. शाळेत सायबर सुरक्षेचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

निटूर : येथील जिल्हा प्रशालेमध्ये क्विक हिल फाउंडेशन अंतर्गत सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये ज्योती दळवे, स्वाती एकोर्गे या विद्यार्थिनींनी सायबरयोद्धा होऊन डिजिटल जगात घडणारे सायबर क्राइम व त्यापासून आपण कसे सावध राहिले पाहिजे याबाबत माहिती दिली.

यावेळी मुख्याध्यापक राठोड, घुमनवाढ, रोळे, जगताप, चौरे, करणवाड, कापडे, सोनटक्के, जगताप, नागमोडे, भिंगोले, चिंचोले यांची उपस्थिती होती. सायबर क्राइम घडला तर कुठे न जाता घरी बसून १९३० या हेल्पलाइन नंबरवर कॉल करून तक्रार नोंदवू शकता, अशी माहिती देण्यात आली. सर्व विद्यार्थी व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांकडून ज्योती दळवे व स्वाती एकोर्गे यांनी सायबर सुरक्षेची शपथ दिली.